178

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

## नियामक मंडळाची २९ वी बैठक दि. १८.०९.२००२

मा. ना. अजित पवार, मा. मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण महामंडळ) व अध्यक्ष (मकृखोविम) यांच्या अध्यक्षतेखाली महामंडळाची २९ वी बैठक दि. १८.०९.२००२ राजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये खालील ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र.२९/१

"ठराव करण्यात येतो की, २८ व्या बैठकीमध्ये पारित केलेले सर्व ठराव कायम करण्यात येत आहेत."

ठराव क्र.२९/२

"ठराव करण्यात येतो की, सोबतच्या परिशिष्ट क्र. १ मध्ये दर्शविलेल्या ४ मोठे, ५ मध्यम व एक लघु प्रकल्पांच्या अंदाजपत्रकांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यास नियामक मंडळाची मंजूरी देण्यात येत आहे.

ठराव क्र.२९/३

"ठराव करण्यात येतो की, वर्ष २००२-२००३ च्या रु. ९७७.४६ कोटोंच्या (रु. ४४३.४६ कोटो चालू कामांसाठी आस्थापनेसह + रु. ५३४ कोटो प्रलंबित दायित्व परतफेड आस्थापनेसह) सोबतच्या परिशिष्ट क्र. २ मध्ये जोडलेल्या कार्यक्रमास नियामक मंडळाची मंजुरी देण्यात येत असून, सदर कार्यक्रम शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात यावा."

ठराव क्र.२९/४

"ठराव करण्यात येतो की, 'दी लेकसिटो कॉर्पोरेशन प्रा. लि. पुणे' यांच्या प्रस्तावातील पाणीवापर हा पर्यटन, नौकानयन व वृक्षसंवर्धन व पिण्यासाठी होणार असून ओद्योगिक कारणांसाठी पाण्याचा वापर प्रस्तावित नाही, त्यामुळे सदर प्रस्तावाबाबत या पूर्वी मंजूर ठराव क्र. २८/६ मधील ओद्योगिक दराने आकारणीची तरतूद सुधारित करुन त्याऐवजी महामंडळाने वेळोवेळी प्रसृत केलेल्या उपरोक्त नमूद प्रयोजनांसाठीच्या पाणी वापरासाठीची पाणीपट्टी लागू करण्यासाठी व त्याअनुषंगाने स्वामित्व शुल्क आकारणीस मा. अध्यक्ष, (मकृखोविम) यांनी दिलेल्या मंजूरीस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

25.9.2002

| | |
|---|---|
| मा. मंत्री (पा) व अध्यक्ष<br>म.कृ.खो.वि.म., पुणे | कार्यकारी संचालक<br>म. कृ. खो. वि. म.,पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

ठराव क्र.२९/५

"ठराव करण्यात येतो की,

अ. धामणी मध्यम प्रकल्प, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर या प्रकल्पाच्या प्रस्तावित बुडीत क्षेत्रात समाविष्ट होणाऱ्या दाजीपूर अभयारण्याच्या मानबेट गट नं. १३० व १३३ मधील ४६ हेक्टर वन्यजीव क्षेत्र, हे धामणी प्रकल्पामुळे होणारे सामाजिक, आर्थिक व पर्यावरणविषयक फायदे विचारात घेता व धामणी प्रकल्पाचा कृष्णा खोरे अंतर्गत जलनियोजनातील सहभाग विचारात घेता, सदरील क्षेत्र वन्यजीव क्षेत्र म्हणून वगळण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा. तसेच सदर प्रस्ताव केंद्र शासनास मान्यतेसाठी सादर करण्याचे दृष्टोने तसेच सुप्रीम कोर्टास याबाबत विनंती करण्याच्या दृष्टोने मंत्रीमंडळासमोर ठेवण्यास शासनास विनंती करण्यात यावी."

ब. धामणी प्रकल्पाची आवश्यकता प्रतिपादन करणारी सर्वंकष टिपणी वरील (अ) प्रमाणे कार्यवाहीसाठी शासनास सादर करण्यात यावी."

ठराव क्र.२९/६

"ठराव करण्यात येतो की, कृष्णा-कोयना उपसा सिंचन योजनेअंतर्गत म्हैसाळ उपसा टप्पा-३,४ व ५ चे काम ९५% पूर्ण झाले असल्याने, सदर भागाची उर्वरीत कामे करणे व दायित्व अदा करणे याबाबत प्राधम्याने कार्यवही करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.२९/७

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या कार्यकक्षेतील जिहे काठापूर उपसा सिंचन योजनेसाठी चारमाही पीकरचना असल्याने या प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात, पुनर्वसनासाठी भूसंपादन करु नये, अशी विनंती राज्य शासनाच्या महसूल खात्यास पाटबंधारे विभागामार्फत करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म. कृ. खो. वि. म.,पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११



परिशिष्ट क्र.१

## सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान केलेले प्रकल्प

| अ.क्र. | प्रकल्पाचे नांव | सुधारित प्रशासकीय मान्यतेची किंमत (रु. कोटी) | दरसूची वर्ष |
|---|---|---|---|
| अ. | ए.आय.बी. पी अंतर्गत अर्थसहाय्यासाठी प्रस्तावित प्रकल्प | | |
| | मोठे प्रकल्प | | |
| १. | उरमोडी प्रकल्प, ता. पाटण, जि.सातारा | ८६७.७७ | २०००-२००१ |
| २. | तारळी प्रकल्प, ता. पाटण, जि. सातारा | ६८५.९३ | २०००-२००१ |
| ३. | भामा आसखेड प्रकल्प, ता. खेड, जि. पुणे | ४५८.१९ | १९९९-२००० |
| ४. | गुंजवणी टप्पा-१ प्रकल्प, ता. वेल्हे, जि. पुणे | ३१६.६० | २०००-२००१ |
| | मध्यम प्रकल्प | | |
| १. | वांग प्रकल्प, ता. पाटण, जि. सातारा | २०९.११ | १९९९-२००० |
| २ | उत्तरमांड मध्यम प्रकल्प,ता.पाटण,जि.सातारा | १०२.३७ | १९९९-२००० |
| ३. | नागेवाडी प्रकल्प, ता. वाई, जि. सातारा | ५१.९५ | १९९९-२००० |
| ४. | आंन्ध्र खोरे प्रकल्प, ता. मावळ, जि. पुणे | ८८.७० | १९९९-२००० |
| ब. | अे. आय.बी. पी. अर्थसहाय्यासाठी प्रस्तावित नसलेले प्रकल्प | | |
| | मध्यम प्रकल्प | | |
| १. | कासारसाई प्रकल्प, ता. मुळशी, जि. पुणे | ३३.०० | १९९८-९९ |
| | लघु पाटबंधारे प्रकल्प | | |
| १. | साठवण तलाव उच्छिल, ता. जुन्नर, जि. पुणे | ६.४४ | २०००-२००१ |

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म. कृ. खो. वि. म.,पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे ११.

## महामंडळांतर्गत प्रकल्प कामांचा वर्ष २००२-२००३ चा प्रकल्पनिहाय आणि जिल्हानिहाय आर्थिक कार्यक्रम

परिशिष्ट क्र.२

### गोषवारा

(रूपये कोटी)

| अनु क्र. | जिल्हा | रु.५३४कोटी थकितापैकी (आस्थापनेसह) | | | मा.राज्यापालांच्या निर्देशानुसार (रू.४४३.४६ कोटी पैकी) (आस्थापनेसह) | एकूण (रु.९७७कोटी) (आस्थापनेसह) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | रू.२८१ कोटीचा झालेला खर्च (आस्थापनेसह) | उर्वरित रू.२५३ कोटीचे नियोजन (आस्थापनेसह) | एकूण (रू.५३४ कोटी) (आस्थापनेसह) | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पुणे | ५७.५० | ६०.७८ | ११८.२८ | ११४.५० | २३२.७८ |
| २ | सातारा | ४५.५८ | ५१.५० | ९७.०८ | ५१.०९ | १४८.१७ |
| ३ | सांगली | ७५.५१ | ५५.८४ | १३१.३५ | ४८.०३ | १७९.३८ |
| ४ | कोल्हापूर | २९.४२ | २५.४६ | ५४.८८ | ५३.७९ | १०८.६७ |
| ५ | सोलापूर | ३६.९६ | ३३.०६ | ७०.०२ | ८४.९० | १५४.९२ |
| ६ | अहमदनगर | २०.७३ | ११.५५ | ३२.२८ | ३१.६९ | ६३.९७ |
| ७ | उस्मानाबाद | १४.८९ | १२.२५ | २७.१४ | ५०.८९ | ७८.०३ |
| ८ | बीड | ०.४१ | २.०६ | २.४७ | ८.५८ | ११.०५ |
| | एकूण एकंदर : | २८१.०० | २५२.५० | ५३३.५० | ४४३.४७ | ९७६.९७ |

मा. मंत्री, पा (कृष्णा खोरे व कोकण पाविमं)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक व सदस्य सचिव
म.कृ.खो.वि.म., पुणे